नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष - ४ रे<br>Year - 4rd | अंक - १८<br>Issue - 18 | वार - शुक्रवार दि. १२ जून २०२६<br>Blow- Friday Date 12 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |

# ओमाननजीक अमेरिकेने मालवाहू जहाजावर केलेल्या भीषण हल्ल्यात तीन भारतीय नाविकांचा मृत्यू



## भारताकडून अमेरिकेच्या राजदूतांना समन्स; भारत आणि अमेरिकाच्या राजनैतिक संबंधात तीव्र पडसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ओमानच्या खाडीत एका व्यावसायिक मालवाहू जहाजावर अमेरिकेने केलेल्या भीषण हल्ल्यात तीन भारतीय नाविकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय नौकानयन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवारी या दुर्दैवी घटनेची माहिती दिली. हे तिन्ही नाविक हल्ल्यानंतर सुरुवातीला बेपत्ता झाले होते, मात्र आता त्यांच्या मृत्यूची अधिकृत माहिती समोर आली. या प्राणघातक हल्ल्यामुळे भारत आणि अमेरिकाच्या राजनैतिक संबंधात तीव्र पडसाद उमटले असून भारताने अमेरिकेच्या राजदूतांना बोलवून कडक शब्दांत निषेध नोंदवला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सेटेबेलो असे अमेरिकन हल्ल्याचा बळी ठरलेल्या या तेल टँकर जहाजाचे नाव होते. या जहाजावर एकूण २८ कर्मचारी होते. यामध्ये २४ भारतीय आणि ४ परदेशी नागरिक (दोन पाकिस्तानी, एक युक्रेनी आणि एक रशियन) यांचा समावेश होता. हल्ल्यात मृत्यू झालेल्या तीन भारतीय नाविकांची ओळख पटली असून त्यांची नावे आदित्य शर्मा (डेक कॅडेट), शिवानंद चौरसिया (इंजिन फिटर), पटनाला सुरेश (चीफ इंजिनिअर) अशी आहेत. या अपघातातून २१ भारतीय कर्मचाऱ्यांना सुखरूप वाचवण्यात यश आले असून त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. जहाज व्यवस्थापन कंपनीला इतर काही कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्यात अडचणी येत आहेत.

अमेरिकन सेंट्रल कमांडच्या लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, हा तेल टँकर इराणवरील आंतरराष्ट्रीय आर्थिक नाकेबंदीचे उल्लंघन करून तेल घेऊन जात होता. अमेरिकन नौदलाने टँकरला दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्यामुळे या जहाजावर हल्ला केला. हा अपघात झाला तेव्हा हे जहाज स्ट्रेट ऑफ होर्मुजमधून जात होते.या घटनेनंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव नागराज नायडू यांनी अमेरिकेचे प्रभारी राजदूत जेसन मीक्स यांना तात्काळ समन्स पाठवून या हल्ल्याबाबत तीव्र संताप व विरोध व्यक्त केला.परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, आम्ही ओमानच्या किनाऱ्याजवळ सेटेबेलो या व्यावसायिक जहाजावर झालेल्या हल्ल्याचा कडक शब्दांत निषेध करतो. या सागरी क्षेत्रात व्यावसायिक जहाजांना आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य केले जाणे अत्यंत चिंताजनक असून हे आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन आहे.

## गंगापूर धरण परिसरात ४ जणांचा बुडून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिकमधून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. नाशिकच्या गंगापूर डॅम परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. आज गुरुवारी ही दुर्दैवी घटना घडली असून या घटनेनं संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.

या हृदयद्रावक घटनेत तीन अल्पवयीन मुलांचा तर एका विवाहित तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेनं चारही कुटुंबावर दुःखांचा डोंगर कोसळला आहे. नाशिक शहरातील तीन तरुण आणि एक विवाहित महिला गंगापूर धरणाच्या बॅक वॉटर भागात फेर फटकामारण्यासाठी गेली होती. पाण्याचा अंदाज न आल्याने एकजण खोल पाण्यात गेला आणि बुडू लागला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात इतर तिघेही पाण्याच्या प्रवाहात ओढले गेले.

## पक्षाच्या हिताला प्राधान्य देऊन कार्यकर्त्यांना संधी देणार : सुनेत्रा पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : २७ वर्षापूर्वी स्वाभिमानातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. अनेक दिग्गज नेत्यांचे कार्यकर्त्यांचे पक्षाच्या जडणघडणीत मोठं योगदान असल्याचे मत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. आज पक्षाचा २७ वा वर्धापन दिन साजरा करताना भावनिक वातावरण आहे. आपल्या सर्वांचे नेते अजितदादा आपल्यात नाहीत. त्यांच्याशिवाय साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असल्याचे पवार म्हणाल्या. अजित दादांना विकसीत महाराष्ट्र प्रेरीत होता हे सांगताना सुनेत्रा पवार भावूक झाल्याचं पाहायला मिळाले.

राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून वेगळ्या परिस्थितीत मी जबाबदारी घेतली आहे. येणाऱ्या सगळ्या गोष्टींची मला जाणीव होती. पदाधिकारी कार्यकर्ता आणि त्यांची निष्ठा माझ्या लक्षात आहे. योग्यवेळी संधी दिली जाईल असे मत सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले.



आतापर्यंत जे घडलं ते मी समजून घेतलं. मी पक्षाचा हिताला प्राधान्य देईल. कुणाचा हस्तक्षेप असेल तर मी लक्ष देईल. दादा ज्याप्रमाणे कडक निर्णय घ्यायचे तो माझा स्वभाव नसला तरी मी तो निर्णय घेईल असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. अजित पवारांना जो विकसित महाराष्ट्र अपेक्षित होता त्यानुसार आपण काम करत राहू. शिव शाहू फुले आंबेडकर यांची विचारधारा पुढे घेऊन जाणं म्हणजे सर्वांना सोबत घेऊन जाणं असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. ग्रामीण आणि शहरी भागात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रभावी उपायोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला काम करावे लागणार आहे. आपल्या पक्षाचा एकही कार्यकर्ता मतदानापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी. बूथ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा समान राखला जाईल. संघटना मजबूत करणे गरजेचे आहे.

प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा ऑक्सिजन आहे. सर्वांनीच लोकसंग्रह वाढवणं समस्या समजून घेणं त्यासाठी सासत्याने प्रयत्न करणे ही कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे.

### पेपर-पुठ्ठ्याच्या साठ्याने आगीने घेतले रौद्ररूप

## वाहुलीतील जय भगवान कॉम्प्लेक्समध्ये भीषण आग; गोडाऊन जळून खाक, लाखो रुपयांचे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

मुंबई-नाशिक महामार्गालगत भिवंडी तालुक्यातील वाहुली गावाच्या हद्दीतील जय भगवान कॉम्प्लेक्समधील पेपर-पुठ्ठ्याच्या गोडाऊनला गुरुवारी दुपारी भीषण आग लागून जळून खाक झाल्याची घटना घडली. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात ज्वलनशील साहित्याचा साठा असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण परिसर धुराच्या लोटांनी व्यापून गेला.



मिळालेल्या माहितीनुसार, जय भगवान कॉम्प्लेक्सच्या बी-१ विभागातील एका पेपर-पुठ्ठा साठवणूक गोडाऊनमध्ये दुपारच्या सुमारास आग लागली. सुरुवातीला लागलेली आग वेगाने पसरत जाऊन शेजारील गोडाऊनपर्यंत पोहोचली. परिणामी गोडाऊन आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. गोडाऊनमधील कागद व पुठ्ठ्याच्या मोठ्या साठ्यामुळे आगीची तीव्रता वाढत गेली. आगीचे प्रचंड लोळ तब्बल ५० फूट उंचीपर्यंत झेपावत होते, तर काळाकुट्ट धुराचे लोट अनेक किलोमीटर अंतरावरून दिसत होते. घटनेची माहिती मिळताच भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले. मात्र, गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर ज्वलनशील साहित्य असल्याने आग विझविण्याच्या कामात अडचणी येत असून आग पूर्णपणे नियंत्रणात आणण्यासाठी आणखी वेळ लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी पडघा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी देखील दाखल झाले असून त्यांनी परिसरातील वाहतूक नियंत्रणात ठेवण्याबरोबरच नागरिकांची गर्दी दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. आगीमुळे कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नसले तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण, सुरक्षा उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह

दरम्यान, आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून अग्निशमन विभागाकडून सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. शॉर्टसर्किट, निष्काळजीपणा किंवा इतर कोणतेही कारण आगीमागे असू शकते, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

आगीमुळे निर्माण झालेल्या दाट धुरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. श्वसनाचे विकार असलेल्या नागरिकांनी आग पूर्णपणे आटोक्यात येईपर्यंत घराबाहेर पडू नये, असे आवाहन अग्निशमन विभागाकडून करण्यात आले आहे.

या घटनेनंतर औद्योगिक व गोदाम संकुलांमधील अग्निसुरक्षा उपाययोजनांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाहुली विकास प्रतिष्ठानच्या सदस्यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की,

संबंधित कंपनी सुरक्षेच्या दृष्टीने अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारच्या गोडाऊन संकुलांमध्ये अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा, पाण्याचा पुरेसा साठा, अग्निशमन वाहनांची उपलब्धता आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक व्यवस्था असणे अत्यावश्यक आहे. तसेच गावातील नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी संबंधित प्रशासन आणि कंपन्यांनी प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

संध्याकाळपर्यंत आग विझविण्याचे प्रयत्न सुरू असून परिस्थितीवर अग्निशमन दल, पोलीस प्रशासन आणि स्थानिक प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.




## संपादकीय....

### तीव्र पडसाद

ओमानच्या खाडीत एका व्यावसायिक मालवाहू जहाजावर अमेरिकेने केलेल्या भीषण हल्ल्यात तीन भारतीय नाविकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय नौकानयन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवारी या दुर्दैवी घटनेची माहिती दिली. हे तिन्ही नाविक हल्ल्यानंतर सुरुवातीला बेपत्ता झाले होते, मात्र आता त्यांच्या मृत्यूची अधिकृत माहिती समोर आली. या प्राणघातक हल्ल्यामुळे भारत आणि अमेरिकाच्या राजनैतिक संबंधात तीव्र पडसाद उमटले असून भारताने अमेरिकेच्या राजदूतांना बोलवून कडक शब्दांत निषेध नोंदवला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सेटेबेलो असे अमेरिकन हल्ल्याचा बळी ठरलेल्या या तेल टँकर जहाजाचे नाव होते. या जहाजावर एकूण २८ कर्मचारी होते. यामध्ये २४ भारतीय आणि ४ परदेशी नागरिक (दोन पाकिस्तानी, एक युक्रेनी आणि एक रशियन) यांचा समावेश होता. हल्ल्यात मृत्यू झालेल्या तीन भारतीय नाविकांची ओळख पटली असून त्यांची नावे आदित्य शर्मा (डेक कॅडेट), शिवानंद चौरसिया (इंजिन फिटर), पटनाला सुरेश (चीफ इंजिनिअर) अशी आहेत. या अपघातातून २१ भारतीय कर्मचाऱ्यांना सुखरूप वाचवण्यात यश आले असून त्यांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. जहाज व्यवस्थापन कंपनीला इतर काही कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्यात अडचणी येत आहेत. अमेरिकन सेंट्रल कमांडच्या लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, हा तेल टँकर इराणवरील आंतरराष्ट्रीय आर्थिक नाकेबंदीचे उल्लंघन करून तेल घेऊन जात होता. अमेरिकन नौदलाने टँकरला दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्यामुळे या जहाजावर हल्ला केला. हा अपघात झाला तेव्हा हे जहाज स्ट्रेट ऑफ होर्मुजमधून जात होते.या घटनेनंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव नागराज नायडू यांनी अमेरिकेचे प्रभारी राजदूत जेसन मीक्स यांना तात्काळ समन्स पाठवून या हल्ल्याबाबत तीव्र संताप व विरोध व्यक्त केला.

# विवेकवादी धम्मसेवक : भिमछावा संघटनेचे प्रमूख निलेश गायकवाड यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!!!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नुकतेच भारतीय बौद्ध महासभेचे दहा दिवसाचे शिबिर संपन्न झाले. सुमारे ३० शिबिरार्थीनी त्यात सहभाग घेतला होता. त्यात निलेश गायकवाड यांचा सिंहाचा वाटा आहे. श्रामनेर शिबिर आयोजित करणे तितके सोपे नाही. त्याचे व्यवस्थापन व कार्यान्वयन अतिशय चोखपणे पणे व्हायला हवे. निलेश गायकवाड यांनी पूर्ण केले आहे. हे प्रशंसनीय आहे. भगवान बुद्धाला अभिप्रेत असलेला धम्म समजून घेणे, व समजून सांगणे व धम्माचरण करणे ही सध्या काळाची गरज आहे. धम्म हा कुशल कर्मावर आधारित आहे. अंधश्रद्धेवर नव्हे. यासाठी पंचशील, अष्टांगिक मार्ग व दसपारमिता ही धम्माची वैशिष्ट्ये आपल्याला नीटपणे कळायला हवी. यासाठी शिबिरे व धम्म देशना आवश्यक आहे. स्वयंप्रकाशित होण्यासाठी धम्म नीटपणे समजून घेणे गरजेचे आहे. बुद्धाचारी, भिक्षू यांचे योगदान लक्षणीय ठरेल.

या पार्श्वभूमीवर निलेशची धडपड ही अतिशय वाखाणण्यासारखी आहे.

निलेशची सतत धडपड .... नवीन रक्त, नवीन ऊत्साह, नवीन ओज... समाज कार्याची आवड..

संघटना एक निमित्त असते. व्यक्तिमत्वाची ओळख व्हावी म्हणून स्वतंत्र अस्तित्व दाखवावे लागते. परंतू मनापासून समाज कार्याची जाणीव ...कोणतेही दोन तारे एकाच दिशेनी प्रवास करत नाहीत. प्रत्येकाचा प्रवास ठरलेला असतो. माणसाकडे क्रियाशीलता असावी. ती सतत वाढत जावी. सामाजिक जीवनाला आवश्यक असणा-या पायाभूत संवेदना असायला हव्यात. माणूस जगू शकतो. माणसाजवळची शक्ती म्हणजे ऊत्साह तो विधायक कार्यासाठी वापर करायला हवा. तो आंबेडकरी विचार घेऊन प्रवासाला सुरूवात ही निश्चितच परिवर्तनाच्या दिशेकडे घेऊन जाते. डॉ. बाबासाहेबांचे जहाल तत्त्वज्ञान समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील असणारा सजग व क्रियाशील कार्यकर्ता म्हणून निलेश यांची ओळख आहे.

निलेशकडे फारसे शिक्षण नाही. परंतू समाजकार्याची आवड, जिद्द, चिकाटी, महत्वाकांक्षा, सचोटी, सातत्य, इतराविषयी तळमळ-कळकळ आहे. लोकसंग्रह भरपूर. माणसाला माणूसकी प्राप्त व्हावी यासाठी वाटेल ते करायला सदैव तयार. समाजातली विषमता, जातीभेद, अस्पृश्यता, स्त्री-पुरूष विषमता, बेरोजगारी, रुग्ण व रुग्णालये समस्या, झोपडपट्यांचे प्रश्नावर सतत संघर्ष चालु असतो. आंबेडकरांच्या क्रांती विचारांची व कार्याचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी तरून पिढीने एकत्रित यावे. सेवा करावी. संघटीत व्हावे. समाजाने शतकानुशतके मनःस्ताप, हालआपेष्ठा सहन केल्या आहेत. यापुढची पिढी ते सहन करणार नाही. या हेतून प्रेरित झालेला निलेश. चळवळीचा निष्ठावंत कार्यकर्ता. जनतेसाठी लाठ्या काट्या खाऊ, परंतू त्यांचे हक्क द्या. गरीबांना सवलती द्या. झोपडपट्टीतील रहिवाश्राना संरक्षण द्या. प्रत्येक प्रश्नावर लढण्याची तयारी असणारा तरून. सत्यासाठी, जनतेच्या अब्रूसाठी, ब्रीदासाठी संघर्ष करत धम्माचरण करणारे निलेश गाकवाड.

निलेश उस्मानाबाद जिल्ह्यातील आष्टाकासार गावातले. कायम दुष्काळी पट्ट्यातले गाव. घरची अत्यंत गरिबी. कोणतीही वातावरण अनुकूल नाही. धड शिक्षण नाही, चेहरा नाही, कोणाचा वरदहस्त नाही, पाठबळ नाही, सतत कष्ट उपसणारे कुटुंब. गावकुसाबाहेरच्या वस्तीत जन्माला आले. रोगट उघड्या बोडक्या घरात. आई वडील प्रंचड कष्टाळू. सतत कष्ट व अंगमेहनत करणारे. घरात शिक्षण नाही. शेती नाही. भूमिहीन शेतमजूर. अंगभर वस्त्र नाही, पोटभर अन्न नाही. निवा-यासाठी जागा नाही.

गरीब कुटूंबात त्याचा जन्म. अठराविश्व दारिद्र असलेले कुटूंब. उपासमार व रोजगाराच्या शोधात पुण्यात आले. रिक्षा चालवून समाजकार्याची धडपड वाखाणण्यासारखी आहे. आपण शिकलो नाही. इतरांना तरी देऊ शकतो. यासाठी सामाजिक बांधिलकी, जाणिवा व समाजभान बाळगून असतात. प्रत्येक माणूस जगला पाहिजे. आत्मोन्नती झाली पाहिजे. वंचित राहाता कामा नये. अन्न, वस्त्र, निवारा मिळाला पाहिजे. भूक व गरिबी हटली पाहिजे. सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट व्हायला हवी. प्रत्येकाला न्याय मिळायला हवा. या विचारांने भाराऊन समाज कार्यात उडी घेतली.




आंबेडकर विचारांची रसद, झेंडा आणि अजेंडा घेऊन.... योग्य दिशेने प्रवास करणाऱ्या माणसाचा आत्मविश्वास कसा जागृत होतो..... कोणत्याही प्रकारचा आधार नाही कायम दुसऱ्याचा आधार घेऊन जगणारी माणसं आयुष्यभर परावलंबी जीवन जगत असतात. परंतु बाबासाहेब आंबेडकरांचे जहाल तत्त्वज्ञान घेऊन प्रवास करणारा माणूस किती स्वाभिमानी व ध्येयवादी असतो हे निलेश गायकवाड यांच्याकडे पाहिल्यानंतर वाटते.

....पुनश्य शुभेच्छा...!

**– डॉ. डी. टी. गायकवाड**
**माजी ग्रंथालय एवं सुचना अधिकारी**
**केंद्रिय जल और विद्युत अनुसंधान शाला,**
**पुणे – ४११ ०२४**

# येणारा काळ अविवाहितांचे युग ठरणार आहे का?




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाज एका शांत पण अत्यंत गंभीर सामाजिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे. हे परिवर्तन ना एखाद्या राजकीय क्रांतीचे आहे, ना आर्थिक उलथापालथीचे, ते आहे बदलत्या कौटुंबिक आणि वैवाहिक मूल्यांचे. एकेकाळी आयुष्याचा अविभाज्य भाग मानला जाणारा विवाह आज अनेक तरुण-तरुणींसाठी पर्याय बनत चालला आहे. शिक्षण, करिअर, आर्थिक स्वावलंबन, शहरीकरण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्या वाढत्या प्रभावामुळे विवाहाचे वय सातत्याने पुढे ढकलले जात आहे. काही जण विवाह न करण्याचाही निर्णय घेत आहेत. त्यामुळे एक प्रश्न आज समाजासमोर उभा ठाकला आहे, येणारा काळ अविवाहितांचे युग ठरणार आहे का? भारतीय समाजव्यवस्थेत विवाह ही केवळ दोन व्यक्तींची वैयक्तिक बाब मानली जात नाही तर तो कुटुंब, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ समजला जातो. शतकानुशतके विवाहसंस्थेने समाजाला एक दिशा दिली, नातेसंबंधांची वीण घट्ट केली आणि पुढील पिढ्यांच्या निर्मितीचा पाया घातला. मात्र आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात विवाहाबद्दलच्या संकल्पना झपाट्याने बदलताना दिसत आहेत.

आजच्या पिढीची जीवनशैली आणि विचारसरणी पूर्वीच्या पिढीपेक्षा पूर्णतः वेगळी आहे. एकेकाळी वीस ते पंचवीस वर्षांच्या वयोगटात विवाह होणे सामान्य मानले जात होते. आज मात्र अनेक तरुण-तरुणी तीस वर्षांनंतरही विवाहाचा निर्णय घेत नाहीत. काही जण करिअरमध्ये स्थिर होण्याची वाट पाहतात, काही आर्थिक स्वावलंबनाला प्राधान्य देतात, तर काहींना वैवाहिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यापेक्षा स्वतंत्र जीवन अधिक आकर्षक वाटते. समाजातील बदलत्या मूल्यव्यवस्थेचा हा परिणाम असला तरी त्याचे दूरगामी परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत. शिक्षण आणि करिअरच्या स्पर्धेने विवाहाला दुय्यम स्थान दिले आहे. उच्च शिक्षणासाठी अनेक तरुण-तरुणी मोठ्या शहरांत किंवा परदेशात जातात. त्यानंतर नोकरी, बढती, व्यवसाय आणि आर्थिक प्रगती यांचा पाठपुरावा करताना विवाहाचा विषय सतत मागे पडत जातो. अनेक पालकसुद्धा आधी करिअर, मग विवाह या विचाराला प्रोत्साहन देतात. परंतु करिअरची शर्यत संपण्याचे कोणतेही निश्चित वय नसते. त्यामुळे विवाहाचा निर्णय सतत पुढे ढकलला जातो आणि नकळत आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा निघून जातो.

दुसरीकडे, आर्थिक स्वावलंबनामुळे व्यक्ती अधिक आत्मनिर्भर झाली आहे. पूर्वी कुटुंब हे आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेचे प्रमुख साधन होते. आज अनेकांना एकटे राहूनही चांगले जीवन जगणे शक्य झाले आहे. त्यामुळे विवाह ही गरज नसून एक पर्याय असल्याची मानसिकता वाढीस लागली आहे. विशेषतः शहरी भागात ही प्रवृत्ती अधिक स्पष्टपणे दिसून येते. मात्र या बदलांचे सामाजिक परिणामही तितकेच गंभीर आहेत. विवाहाचे वय वाढल्याने जन्मदर कमी होतो. अनेक विकसित देश आज लोकसंख्या घटण्याच्या संकटाला सामोरे जात आहेत. जपान, दक्षिण कोरिया आणि इटलीसारख्या देशांमध्ये विवाहाचे प्रमाण घटले असून वृद्धांची संख्या झपाट्याने वाढत आहे. भारताची परिस्थिती अजून तितकी गंभीर नसली तरी महानगरांमध्ये त्याची प्रारंभिक चिन्हे दिसू लागली आहेत. लहान कुटुंबे, एकुलती एक मुले आणि वाढता एकटेपणा ही त्याची काही उदाहरणे आहेत. अविवाहित राहण्याच्या वाढत्या प्रवृत्तीमुळे कौटुंबिक रचनेवरही परिणाम होतो. संयुक्त कुटुंब व्यवस्था आधीच कमकुवत झाली आहे. त्यात विवाह उशिरा होणे किंवा न होणे यामुळे कुटुंबसंस्थेची परंपरागत रचना अधिकच ढासळू शकते. वृद्ध पालकांच्या आधाराचा प्रश्न निर्माण होतो. अनेक कुटुंबांत मुलगा किंवा मुलगी अविवाहित राहिल्यास पुढील पिढीची साखळीच तुटते. यामुळे सामाजिक नातेसंबंधांचे जाळे हळूहळू कमकुवत होत जाते.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
**भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९**
**ई-मेल: pravinbagde@gmail.com**

याचा अर्थ असा नाही की विवाह न करणारे सर्वच लोक चुकीचे आहेत. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. काही जण जाणीवपूर्वक अविवाहित राहण्याचा निर्णय घेतात आणि त्यात समाधानीही असतात. काहींसाठी विवाह योग्य पर्याय नसू शकतो. त्यामुळे विवाहाला सक्तीचे स्वरूप देणे किंवा अविवाहित राहणाऱ्यांना दोष देणे योग्य ठरणार नाही. प्रश्न व्यक्तिस्वातंत्र्याचा नसून सामाजिक संतुलनाचा आहे. खरे तर समस्या विवाह उशिरा होण्यात नाही, तर जीवनातील प्राधान्यक्रमांच्या असंतुलनात आहे. करिअर, पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची आहेतच, पण त्याचवेळी नातेसंबंध, कुटुंब आणि भावनिक आधारही तितकाच महत्त्वाचा आहे. आधुनिक जीवनशैलीत अनेकांना व्यावसायिक यश मिळते, पण वैयक्तिक आयुष्यात एकटेपणाची पोकळी जाणवते. सोशल मीडियावर हजारो मित्र असले तरी संकटाच्या वेळी सोबत उभे राहणारे काहीच लोक असतात. कुटुंब ही त्या अर्थाने केवळ सामाजिक संस्था नसून भावनिक सुरक्षेची जागा आहे.

पालकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. अनेक पालक आपल्या मुलांकडून अत्यधिक अपेक्षा ठेवतात. शिक्षण, नोकरी, घर, गाडी आणि आर्थिक स्थैर्य या सर्व गोष्टी पूर्ण झाल्यानंतरच विवाहाचा विचार करावा, असा आग्रह धरला जातो. परिणामी विवाहासाठी योग्य काळ निघून जातो. मुलांच्या आयुष्याविषयी निर्णय घेताना त्यांच्या भावनिक आणि सामाजिक गरजांचाही विचार होणे आवश्यक आहे. समाजानेही बदलत्या वास्तवाला समजून घेण्याची गरज आहे. आजची पिढी पूर्वीच्या पिढीसारखी विचार करणार नाही, हे स्वीकारावे लागेल. विवाहाबाबत संवाद अधिक खुला आणि समंजस असला पाहिजे. विवाह म्हणजे केवळ सामाजिक दबाव किंवा परंपरेचे पालन नसून परस्पर आदर, जबाबदारी आणि सहजीवनाची तयारी आहे, हे तरुणांना पटवून सांगावे लागेल.

भारतासारख्या देशात कुटुंबसंस्था अजूनही सामाजिक जीवनाचा कणा आहे. त्यामुळे विवाहसंस्थेचे महत्त्व पूर्णपणे संपुष्टात येईल, असे म्हणणे घाईचे ठरेल. मात्र विवाहाचे वय वाढणे, अविवाहित राहण्याची प्रवृत्ती वाढणे आणि जन्मदरात घट होणे ही वास्तवातील चिन्हे आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेवटी प्रश्न एवढाच आहे की, आपण आधुनिकतेच्या नावाखाली नातेसंबंधांचे महत्त्व विसरत तर नाही ना? करिअर, पैसा आणि यश यांच्यामागे धावताना कुटुंबाच्या उबदार सावलीपासून दूर तर जात नाही ना? समाजाची खरी ताकद केवळ अर्थव्यवस्थेत नसते तर ती कुटुंब, संस्कार आणि परस्पर आधाराच्या नात्यांत असते.

जर पुढील पिढीने विवाहसंस्थेकडे केवळ ओझे किंवा बंधन म्हणून पाहण्यास सुरुवात केली, तर त्याचे परिणाम केवळ वैयक्तिक पातळीवर नव्हे तर संपूर्ण समाजरचनेवर होतील. म्हणूनच आज गरज आहे ती संतुलित विचारांची, समंजस निर्णयांची आणि नातेसंबंधांच्या पुनर्मूल्यांकनाची. कारण विकासाची खरी व्याख्या केवळ आर्थिक समृद्धी नसून मजबूत कुटुंबे, सुदृढ नातेसंबंध आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध समाज हीच आहे. येणारा काळ अविवाहितांचे युग ठरेल की नाही हे भविष्य ठरवेल, पण कुटुंबसंस्था, विवाह आणि मानवी नातेसंबंधांचे महत्त्व कधीच संपणार नाही, हे तितकेच खरे आहे.

# कळंब येथे साने गुरुजी कथामालेचा सत्कार सोहळा; सुरेश टेकाळे, सोपान पवार, रतन चौधरी यांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) -कळंब येथे अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला कळंब यांच्या वतीने १०जून रोजी संत ज्ञानेश्वर बालक आश्रमात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात शिक्षण, साहित्य आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.



धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष मुख्याध्यापक सुरेश टेकाळे यांना धाराशिव जिल्हा साने गुरुजी कथामालेचा आदर्श जिल्हा स्तरीय मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर करण्यात आला. याच दिवशी त्यांचा वाढदिवस असल्याने दुहेरी आनंदाचा क्षण ठरला.

अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला कळंब तालुका अध्यक्ष आणि साहित्यिक सोपान पवार यांना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या पनवेल येथील राष्ट्रीय अधिवेशनात महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उपक्रमशील शिक्षक आणि साहित्यिक म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली.

सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सौ. रतन भागवत चौधरी यांचा फेटा, शाल आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. धाराशिव जिल्हा सहकार बोर्डावर त्यांची निवड झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यांच्या वतीने हा सत्कार भागवत चौधरी यांनी स्वीकारला.

कार्यक्रमात मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे तालुका सचिव माधवसिंग राजपूत, साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ. गिरीष कुलकर्णी, प्राचार्य महादेव गपाट यांनी सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव केला. कै. डी.के. कुलकर्णी यांच्या कार्याचा आदर्श घेऊन साने गुरुजी कथामालेची टीम कार्यरत असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचलन अशोक शिंपले यांनी केले. संपादक सुभाष घोडके, ओबीसी शिक्षक संघटनेचे अशोक शिंपले, शिक्षक प्रदीप यादव, रमेश शिंदे, गौतम जाधवर, डोईफोडे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# ॲट्रॉसिटी अंतर्गत खून प्रकरणातील वारस शोध मोहीम; १५ दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक २० नोव्हेंबर २०२५ अन्वये ॲट्रॉसिटी अधिनियमांतर्गत खून व मृत्यू झालेल्या पीडितांच्या वारसांना शासकीय नोकरी देण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्यात येत आहे. दिवंगत दत्ता लक्ष्मण खंदारे यांचा खून झाल्याने अक्कलकोट एमआयडीसी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२६/२०२० अन्वये नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याची नोंद अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत करण्यात आलेली आहे. या प्रकरणी पात्र वारसदारांचा शोध घेण्यात येत आहे; मात्र चौकशीनुसार वारसदारांची माहिती प्राप्त झालेली नाही.

त्यामुळे दिवंगत दत्ता लक्ष्मण खंदारे यांची पत्नी, अपत्य वा अन्य कायदेशीर वारसदार असल्यास त्यांनी या जाहीर प्रकटनाच्या प्रसिध्दीपासून १५ दिवसांच्या आत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तिसरा मजला, सात रस्ता, सोलापूर या कार्यालयास संपर्क साधून आपले वारसत्व सिद्ध करणारी कागदपत्रे सादर करावीत. यात वारस प्रमाणपत्र, आधार कार्ड, जन्म दाखला, रेशन कार्ड तसेच इतर संबंधित पुरावे यांचा समावेश असावा.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत, दावा अथवा वारसत्वाबाबतची माहिती प्राप्त न झाल्यास उपलब्ध अभिलेखांच्या आधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्याबाबत नंतर करण्यात येणारे कोणतेही दावे किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार आषाढी वारी पूर्वी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन व संवर्धन

## जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांची माहिती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे जतन व संवर्धन करण्यासाठी आज मंदिरात तज्ज्ञ व्यक्तींमार्फत निरीक्षण करण्यात आले. आषाढी यात्रेपूर्वी मूर्तीचे दीर्घकालीन जतन व संवर्धन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक सल्लामसलत करून निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिली.

बैठकीस मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समिती सदस्य, सल्लागार परिषद सदस्य, स्थानिक महाराज मंडळी, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, मूर्ती संवर्धन तज्ज्ञ तसेच पत्रकार प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी सांगितले की, भारतातील एकमेव असे मंदिर आहे जिथे भाविकांना पददर्शन घेता येते. मूर्ती दीर्घकाळ टिकावी यासाठी तिचे जतन व संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. वज्रलेप करण्याबाबत तज्ज्ञांनी आपली मते मांडली असून कोणती पद्धत वापरायची याबाबत पुरातत्त्व विभागाचा सल्ला घेऊन दोन ते तीन दिवसांत निर्णय घेण्यात येईल.दररोजच्या नित्योपचारात दही, दूध, मध यांसारख्या पदार्थांचा वापर होत असल्याने मूर्तीच्या आतील बाजूस काही नुकसान झाले आहे का, याची तपासणी करण्यासाठी लायडार स्कॅन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र स्कॅनिंगमुळे मूर्तीला हानी होऊ शकते का, याचा अभ्यास करूनच निर्णय घेण्यात येईल. यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले की, श्री विठ्ठलाची मूर्ती स्वयंभू असून वारकरी भाविकांचा श्वास आहे. मूर्तीचे जतन व संवर्धन मंदिर समितीमार्फत पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येईल. वज्रलेप करण्यास समितीचा विरोध नाही, मात्र सर्व महाराज मंडळी व तज्ज्ञांच्या सामोपचाराने निर्णय घेतला जाईल.

कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले की, मूर्ती जतन आणि संवर्धनाच्या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर तसेच राज्य पुरातत्त्व विभागाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सल्लामसलत करून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

बैठकीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित तज्ज्ञ एस. सुब्रमण्यम, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण छत्रपती संभाजीनगरचे उपअधीक्षक डॉ. विनोद कुमार, सेवानिवृत्त अधिकारी विलास मंगीराज, सहाय्यक संचालक डॉ. विलास वाहने, आशीर्वाद ऐरानी, विकास सावंत व महेशाचार्य उत्पात यांनी मूर्ती संवर्धनासंदर्भातील तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती प्राचीन असून पूर्वीपासून नैसर्गिक पद्धतीने वज्रलेपन करण्यात येत होते. हीच पद्धत पुढेही वापरावी, अशी सूचना वीर महाराज यांच्या सह अन्य महाराज मंडळींनी बैठकीत केली.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आरोग्य व दीर्घायुष्यासाठी सूर्यनारायण मंदिरात महाआरती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : देशाचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी जनतेतून निवडून येत सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविण्याचा मान मिळविल्याबद्दल त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व उज्ज्वल भविष्यासाठी भारतीय जनता पार्टी, करकंब मंडलाच्या वतीने नारायण चिंचोली येथील प्रसिद्ध सूर्यनारायण मंदिरात विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले.

भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य मा. लक्ष्मणराव धनवडे यांच्या शुभहस्ते महाआरती संपन्न झाली. यावेळी उपस्थित कार्यकर्ते व नागरिकांनी श्री सूर्यनारायणाच्या चरणी प्रार्थना करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निरोगी, दीर्घ व यशस्वी आयुष्य लाभावे, अशी कामना व्यक्त केली.

कार्यक्रमास करकंब मंडलातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.भाजपा किसान मोर्चा प्रदेश सचिव माऊली भाऊ हळणवर, गहिनीनाथ चव्हाण, नानासो सरवळे, लक्ष्मण (तात्या) कोले, पोपट पाटील, आप्पासो वाघमोडे, हरिभाऊ माने, विठ्ठल माने, बळवंत धनवडे, विष्णूपंत माने, शिवाजी वसेकर, श्रीधर कोळेकर, चंद्रकांत पाटील, नारायण गुंड, मुकुंद घाडगे, बाळू बनसोडे, रमेश कोले, भाऊसाहेब माने, साधू नलवडे, सुनील माने, संदीप हिंगमिरे, ज्ञानेश्वर वाघमोडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

देशाच्या विकासासाठी व जनकल्याणासाठी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाला अधिक बळ मिळावे, तसेच भारत विश्वगुरू बनण्याच्या दिशेने आणखी वेगाने वाटचाल करावा, अशी भावना उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली.

# टाकळीवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत युवा पिढीचा वाढता सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी प्रतिनिधी : टाकळीवाडी (ता. शिरोळ) येथील आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गावातील युवा पिढीचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढताना दिसत आहे. ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावण्याची तयारी युवक-युवतींनी दर्शविल्याने निवडणुकीचे वातावरण अधिक उत्साही बनले आहे.

गेल्या काही दिवसांपासून गावात विविध राजकीय गटांच्या बैठका, चर्चा आणि नियोजन सुरू असून त्यामध्ये युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून गावातील प्रश्न, विकासकामे आणि नागरिकांच्या अपेक्षा याबाबत जनजागृती केली जात आहे.

युवकांमध्ये स्वच्छ प्रशासन, मूलभूत सुविधा, रोजगार, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील विकास या मुद्द्यांवर विशेष भर दिला जात आहे. अनेक तरुण मतदार प्रथमच मतदानाचा हक्क बजावणार असल्याने निवडणुकीबाबत त्यांच्यात उत्सुकता निर्माण झाली आहे.

ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाची प्रमुख संस्था असल्याने युवकांनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन सुजाण मतदार म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन गावातील ज्येष्ठ नागरिकांकडून करण्यात येत आहे. युवा पिढीच्या वाढत्या सहभागामुळे यंदाची ग्रामपंचायत निवडणूक अधिक रंगतदार आणि चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# विवेक वर्धनी विद्यालय येथे मुंबई अँटी करप्शनचे डी .आय .जी. संदीप दिवाण यांची मार्गदर्शन व अध्यापनत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या विषयावर कार्यशाळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : श्री दादासाहेब सौंदळे शिक्षण प्रसारक मंडळ संचालित वेग वर्धनीच्या ज्युनिअर कॉलेज पंढरपूर तसेच श्री दत्त विद्या मंदिर सृष्टी विवेक पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय पंढरपूर येथील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी मुंबई चे डी .आय. जी. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शन आयोजित केले होते.

यावेळी त्यांनी शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनात शिल्पकार असून त्यांच्या हातून घडणारे विद्यार्थी हे समाजात आदर्श कसे घडतील यासाठी सातत्याने शिक्षकाने प्रयत्न करावा तसेच शालेय कामकाज तंत्रज्ञानाच्या प्रभावी करावा जेणेकरून आपला विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे पडणार नाही यासाठी शिक्षकांनी दक्ष राहणे गरजेचे आहे तसेच कोणत्याही गुन्हेगारी पासून विद्यार्थ्यांना वाचवायचे असेल तर त्यांचे व त्यांच्या पालकांचे समुपदेशन करणे हे गरजेचे असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे प्राचार्य डॉक्टर मुंडे यु.आर. यांनी केले प्रास्ताविक त्यांनी प्रशालीमध्ये जुनिअर कॉलेज या ठिकाणी डिजिटल सुविधा विषयी व प्रशाला आणि कॉलेजमधील विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच शासनाच्या ज्या योजना जाहीर करत आहे त्यापूर्वी आम्ही विद्यार्थ्यांमध्ये व कॉलेजमध्ये या सुविधा अगोदर पासून पूर्ण केल्या असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी संदीप दिवाण यांनी शिक्षकांची विविध विषयांवर हितगुज करून विविध प्रश्नांची माहिती दिली व कॉलेजमधील सर्व सुविधांची पाहणी करून समाधान व्यक्त केले व अशा प्रकारचे कॉलेज व प्रशाला ही एक आदर्श असल्याने त्यांनी सांगितले व त्यानंतर रेडिओ स्टार दिलीप ठुमके यांनी उपस्थिती त्यांना आपल्या गायनातून उपदेश केला. यावेळी व्यासपीठावर सौ दिवाण सौ टोमके संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर मदन जी क्षीरसागर, सचिव अँड वैभव टोमके तसेच उपप्राचार्य थिटे एसजी दत्त विद्यामंदिर चे प्राचार्य कटक दौंड प्राध्यापकांच्या मुख्याध्यापिका स वाटकळे एकवर्धनीचे सर्वेक्षक पवार हेए विभाग प्रमुख चौगुले दत्त विद्या मंदिर सुस्ते सर्वेक्षक कट्टे सर ढगे सर तसेच सर्व शिक्षक विभागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितोळे मॅडम यांनी केले तर आभार उपप्राचार्य शिंदे यांनी केले व मानले. यावेळी आधुनिक तंत्रज्ञानाच्या अध्यापनात वापर या विषयावर प्रशालेतील शिक्षक कुंभार व दिनकर सर आल्हाट सर यांनी सर्व शिक्षकांना गुगल चा वापर अध्यापना व दातार सॉफ्टवेअर इत्यादी विषयाची माहिती देण्यात आली.

**पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई**

# पंढरपूर तालुका पोलिसांची रात्रग्रस्त दरम्यान पुण्यातून बेपत्ता असलेले दोन अल्पवयीन बालकांना शोधून काढले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : दिनांक १० जून २०२६ रोजी पाटील तीन वाजता सुमारास उरुळी कांचन पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथील पोलिसांनी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीमध्ये रात्री ग्रस्त करता असलेली पोलीस निरीक्षक श्री टी वाय मुजावर, रात्रग्रस्त करता असलेली पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे यांनी माहिती दिली त्यानंतर पंढरपूर तालुका पोलिसांनी सदरची माहिती माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री प्रशांत डगळे साहेब यांना कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौजे आणवली फाटा येथे सोळा वर्षे वयाची दोन अल्पवयीन मुले घरात किरकोळ कारणावरून भांडण करून उरळी कांचन येथून सोलापूरच्या दिशेने बेंगलोरला निघून जात आहेत तरी सदर दोन्ही अल्पवयीन मुलांचा शोध घेऊन ताव्यामध्ये घ्यावे अशी माहिती मिळाल्यानंतर पंढरपूर तालुका पोलिस आणि पहाटे तीन वाजता शोध मोहीम राबवली व अनवली फाटा या ठिकाणी जाणाऱ्या ट्रक चालकाकडे विचारपूस केले असता पुणे बेंगलोर जाणाऱ्या ट्रक जवळ दोन अल्पवयीन मुली पंढरपूर तालुका पोलिसांना मिळून आल्यानंतर पोलिसांनी त्यांची नावे पत्ते खात्री करून उरळीकांचन पोलिसांना संपर्क केला व त्या मुलाकडे विचारपूस केले असता सदर दोन्ही मुलांनी सांगितले की किरकोळ कारणावरून घरांमध्ये वडिलांनी रागावल्यामुळे हे दोन्ही मुले पुण्यातून घर सोडून बेंगलोर कडे जात होती व रस्त्यामध्ये ट्रकचालक या वाहनांमध्ये अनवली फाटा येथे चाकातील हवा चेक करण्यासाठी थांबले असता तेथे ट्रक मधून उतरून दुसऱ्या गाडीची वाट पाहत अशी माहिती मिळाल्यानंतर त्या मुलांना पंढरपूर तालुका कौन्सिलिंग करून समजावून सांगितले. व त्यांना पोलीस स्टेशन येथे घेऊन त्यांची जेवणाची सोय केली व त्यांच्या नातेवाईकांच्या संपर्क केला व नाहीतर बाईक आणि उरुळी कांचन ची पोलीस बोलावून घेऊन पहाटे पोलिसांच्या ताब्यामध्ये दोन्ही मुलांना सुखरूपपणे दिलेली आहे अशा पद्धतीने घरातील लहान मुले किरकोळ रागावल्याच्या कारणावरून एवढे मोठे पाऊल घेऊन पाऊल उचलून अनोळखी माणसाबरोबर लिफ्ट घेऊन ट्रकमध्ये बेंगलोर रोड कडे चाललेली होती हे अत्यंत मनाला हेलकावणारी गोष्ट आहे परंतु परत पंढरपूर तालुका पोलिसांनी वेळी तत्परता दाखवून दोन्ही मुलांचे मन परिवर्तन करून त्यांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिलेले आहे नातेवाईकांनी मुलांना ताब्यात घेऊन पुण्याकडे उरळीकांचन ते पोलीस असा रवाना झालेले आहेत.

पुणे मुलांना पालकांनी संपूर्णपणे शहरामध्ये शोध घेतला परंतु मिळून आले नाहीत पहाटे पंढरपूर तालुका पोलिसांनी शोध मोहीम राबवून मुले ताब्यात मध्ये सुखरूप घेऊन घेऊन कॉन्सलिंग करून नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याने नातेवाईकांनी मुलांना पाहून तालुका पोलिसांचे आभार मानले सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे, तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, पीएसआय विक्रम वडणे, साहेब फौजदार सुधाकर हेंबाडे, ठाणे अंमलदार पोलीस हवालदार मंगेश रोकडे व चालक पोलीस कॉन्स्टेबल रामभाऊ चाटे यांनी कारवाई केलेली आहे.

# मनीष अन् किरण देशमुख यांच्या उपस्थितीत राजेंद्र राऊत यांचा विजयाचा निर्धार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या प्रचारार्थ शहरातील हॉटेल बालाजी सरोवर येथे महत्वपूर्ण संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. पूजा बैठकीला पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याण शेट्टी, महापौर विनायक कोंड्या, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते भाजपचे अध्यक्ष रोहिणी तडवळकर मनीष देशमुख डॉक्टर किरण देशमुख नगरपालिका सभागृहनीती नरेंद्र काळे यांच्यासह भाजपची पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते व स्थानिक लोकप्रतिनिधी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची संवाद साधत माहितीच्या विजयासाठी एकजुटीने काम करून महापालिकेतील नगरसेवकांपैकी शंभरहून अधिक मतदान देण्याचा निर्धार करण्यात आला.

बैठकीत उपस्थित मान्यवरांनी राज्यातील माहिती सरकारने राबवलेल्या विकास कामाचा आढावा घेत आगामी निवडणुकीत विकास पारदर्शक प्रशासन आणि जनहिताच्या योजनेच्या बळावर मतदारांचा विश्वास संपादन करण्याचा निर्धार व्यक्त केला मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विकासाची गती कायम राखली असून राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांचा लाभ सर्वसामान्यापर्यंत पोहोचत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# पंढरपूर तालुका पोलिसांची अवैद्य वाळू वाहतुकीवर कारवाई; १६ लाख २४ हजार रुपये मुद्देमाल जप्त

## पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलिसांनी मौजे आंबेगाव मध्ये पंढरपूर उपविभागाचे माननीय साहेब पोलीस अधीक्षक सहाय्यक श्री प्रशांत दगडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली विविध वाळू वरती कारवाई करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलिसांनी मौजे आंबेगाव येथे रेड करून त्या ठिकाणी एक हायवा टिपर त्याचा क्रमांक एम एच १३ डी क्यू २८ ते ३० यामध्ये चार ब्रास अवैधरित्या सोडलेली वाळू असा एकूण १६ लाख २४ हजार रुपये चा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतलेला आहे सदर हायवा टिप्पर चा चालक नामे अजय अण्णाप्पा व मालक दादा सावंत राहणार मंगळवेढा मालक यांच्या विरोधात पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता बीएनएस कायदा कलम ३०३, ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री विजय कबाडे साहेब माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री प्रशांत दगडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर, उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक रणदिवे, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, संजय गुटाळ, पोलीस कॉन्स्टेबल असंन, नदा गोडसे यांच्या पथकाने केली आहे.



## दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिरात रंगणार कोकणातील प्रतिभावंत शाहिरांचा शक्ती तुऱ्याचा जंगी सामना




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज): कोकणातील पारंपरिक लोककला होळी आणि गणेशोत्सव हे कोकणातील खरे खुरे उत्सव.या दोन्ही उत्सवासाठी येथील शेतकरी मोकळा असतो.भाताची लावणी संपली की घरोघरी गणपती येतात आणि भाताची कापणी / मळणी संपताच शिमग्याचे म्हणजेच होळीचे वेध लागतात.

### नवतरुण ग्रामस्थ मंडळ(कोचरी – भोजवाडी तर्फे आयोजन

कोकणातील या दोन्ही सणांशी येथील लोककला निगडित आहेत. शक्ती-तुरा (जाखडी) हा सामूहिक नृत्याचा प्रकार आहे.गणेशोत्सवात गावातील प्रत्येक वाडीत जाखडीचा संच असतो.आठ गडी फेर धरून वादकांच्या भोवती नाचतात. ढोलकी आणि घुंगरू ही पारंपरिक वाद्ये आणि आधुनिक डांगाची गाणी यांचा मेळ जाखडीत असतो. जाखडीत आता अनेक बदल झालेत.वेशभूषा,प्रकाश योजना,संगीत आणि वाद्यवृंद यांनी सध्याची जाखडी वेगवान आणि रंगीतसंगीत बनली आहे.आता जाखडीचा जंगी सामना जणू प्रेक्षकांसाठी पर्वणी असते.कोकणातील लोककला हिच जतन करण्यासाठी आणि रसिक मनोरंजनासाठी राजापूर - लांजा असा दिग्गज शाहिरांचा जंगी मुकाबला रंगणार आहे.यामध्ये शक्तीवाले शाहीर लक्ष्मण सावंत,गायक पवन सावंत,सह. सत्यवान सुया राघव- भानुदास घराण्यातील,गुरुवर्य सखाराम रावणंग वस्ताद प्रभाकर धकटु यांचे शिष्य (शाखा:केदारलिंग गांगेश्वर नाच मंडळ,गोटणे - दोनिवडे,राघववाडी,ता. राजापूर्यांच्याविरुद्ध तुरेवाले शाहीर कवी विजय भोज सह.मनोहर भोज - मूलगादी बाबू रंगले घराणे,शीघ्र कवी गुरु वासुवाणी यांचे शिष्य,गुरु शंकर तुकाराम वस्ताद मधुकर पंदरे,तुषार पंदरे, दत्ताराम भोज यांचे शिष्य(शाखा : गांगेश्वर नाच मंडळ,कोचरी - भोजवाडी,ता.लांजा,जि. रत्नागिरी हे शाहीर शक्ती-तुरा रसिकांचे मनोरंजन करणार आहेत.रसिक हो आपली उपस्थिती अनमोल असून हा सामना रविवार दि.१९ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वा. छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर दादर(पश्चिम)मुंबई येथे होणार आहे.या सामन्याचे आयोजन नवतरुण ग्रामस्थ मंडळ(कोचरी - भोजवाडी) कोचरी गांगेश्वर नाच मंडळ(लांजा, रत्नागिरी)यांनी सुखकर्ता गणेश मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी निधी संकलनार्थ केले असून अधिक माहितीसाठी किंवा तिकिट बुकिंगसाठी सुनिल भातडे-९८६७७१३९४७,महेश मांडवकर-९६६२२४१९६६, सुनिल भोज - ९८१९२१७९७७, वसंत भातडे - ९७६८९२६२२७ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सैनिक टाकळीच्या कन्या डॉक्टर पुनम जाधव पाटील यांची असिस्टंट प्रोफेसर पदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी संजय चव्हाण : सैनिक टाकळी येथील डॉक्टर सिद्धू आप्पासाहेब पाटील यांच्या द्वितीय कन्या पुनम जाधव पाटील यांची नुकतीच विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे इलेक्ट्रॉनिक्स या विषयाकरता सीनियर विभागांमध्ये असिस्टंट प्रोफेसर (कायमस्वरूपी) या पदावरती निवड झाली.



पुनम या लहानपणापासूनच खूप हुशार विद्यार्थिनी म्हणून ओळखल्या जात.

त्या छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या माजी विद्यार्थिनी आहेत.

महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथेच पूर्ण झाल्यानंतर त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स या विषयात पदवी पूर्ण केली

मास्टर डिग्री घेताना त्या विद्यापीठांमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन सुवर्णपदक विजेत्या ठरल्या.

यावरच न थांबता त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील नेट व सेट यासारख्या अवघड परीक्षा देखील पहिल्याच प्रयत्नात पास केलेले आहेत.

त्यांना अध्यापनच्या क्षेत्रातील सोळा वर्षाचा अनुभव असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या साठी त्यांची ही यश प्रेरणादायी ठरेल.

दोन तीन हजारापासून अध्यापनाची ही साधना सुरू केल्यानंतर आज सोळा वर्षानंतर त्यांची कायमस्वरूपी प्राध्यापक म्हणून निवड म्हणजे त्यांचे परिश्रम त्यांची दृढता व त्यांचा संयम याचीच प्रचिती देते.

आयुष्यातील खडतर प्रवासाचे टप्पे पार करत संसाराची जबाबदारी सांभाळत सैनिक टाकळीच्या या कन्येचे यश कित्येक मुलींसाठी प्रेरणादायी व आदर्श उदाहरण आहे.

त्यांच्या या यशामागे त्यांचे पती त्यांचे आई-वडील, सासू-सासरे, त्यांचे सर्व शिक्षक व संपूर्ण कुटुंब यांचे पाठबळ मिळाले.

## मोदींच्या ऐतिहासिक कार्यकाळानिमित्त घाटकोपरमध्ये भाजपाचा जनसेवेचा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज): देशाचे लोकप्रिय आणि सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कामगार आघाडीच्या वतीने सामाजिक उपक्रमाचे आयोजन घाटकोपर पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे आयोजन कामगार आघाडीचे मुंबई सचिव साहेबराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच आमदार राम कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत रिक्षाचालक व प्रवाशांना मोफत हायड्रेशन किट वाटप,जठड,पिण्याचे पाणी,ताक आणि वडापावाचे वाटप करण्यात आले.उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा मिळावा



आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमाला नागरिकांचा तसेच रिक्षा चालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी मनपा एन विभाग प्रभाग समिती अध्यक्षा सौ.अश्विनी मते,ईशान्य मुंबई जिल्हा महामंत्री चंद्रकांत मालकर,जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे,रवि पुज तसेच विविध मंडळ अध्यक्ष,वॉर्ड अध्यक्ष आणि पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रोळी पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले यांनी केले.

## अल्पभूधारक शेतकऱ्यांना नवीन वीज कनेक्शन तातडीने द्या: खासदार प्रणिती शिंदे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील काशिगाव येथे सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी भेट घेऊन शेतकरी व ग्रामस्थांना संवाद साधला यावेळी त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन विविध प्रश्नावर चर्चा केली.

त्या भेटीदरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या शेती व ब्रिजपुरवठ्यासाठी संबंधित समस्या खासदार पणजी शिंदे यांच्यासमोर मांडल्या विशेषतः महाविद्यालयाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत कृषी पंपाच्या बीज कनेक्शन वर होत असलेल्या कारवाईमुळे शेतकरी अडचणीत आल्याची सांगितले.

यावेळी खासदार पणती शिंदे म्हणाले की महावितरण कंपनीच्या मनमानी कारभारामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य वीज ग्राहक त्रस्त झाले आहेत. पिकांना पाणी देण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या कालावधीत कृषी पंपाचे वीज कनेक्शन तोडणे अन्यायकारक असून ही सक्तीची वसुली तात्काळ थांबवण्यात यावी तसेच कोणतीही अड न लावता अल्पधारक शेतकऱ्यांना नवीन वीज कनेक्शन तातडीने देण्याचे गरज असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय प्रलंबित डीपी विद्युत रोहित या संदर्भात कामे त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना ही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या व नवीन डीपी मंजूर करून वीज पुरवठा संबंधित अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ते कारवाई करण्यात यावी निर्देशित देण्यात आले.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल महावितरण प्रशासनाला जनसहितच्या दृष्टीने जबरदस्तीने कामे करावे लागेल अशी वही खासदारपणे ती शिंदे यांनी यावेळी दिली.

यावेळी पंढरपूर तालुक्यातील काँग्रेसचे अध्यक्ष संदीप पाटील माजी सरपंच दाजी देशमुख चंद्रभागा शुगरचे माजी संचालक भारत भुसे सचिन देशमुख जिल्हा समन्वयक मनोज गुरुवार महेश आडतराव अमोल जाधव ऋषिकेश देशमुख नवनाथ पडोळकर आप्पासो भानगारे अंकुश गवळी औदुंबर जाधव सौदागर जाधव बंडू भोसले दत्ता जाधव कैलास जाधव महादेव जाधव दत्तात्रय खर्च तुकाराम गवळी गुलचंद जाधव नारायण शिंदे गुरुजी सिताराम कॉलवर मे लाला गुरव गोविंद गवळी नंदू न्यानेश्वर जाधव, नितीन मोरे मच्छिंद्र शिंदे, मायाप्पा जाधव यांच्यासह ग्रामस्थ शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोणताही व्यक्ती समाजापेक्षा मोठा नाही: प्रमाणित लेखापरीक्षक चंद्रकांत शिंदे यांचे मत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : कोणताही व्यक्ती कार्यकर्तृत्वाने किंवा पदाने कितीही मोठा झाला तरी तो समाजापेक्षा मोठा नाही शेवटी व्यक्ती पेक्षा समाज मोठा आहे तेंव्हा सामाजिक जाणीव ठेवून आपण खारीचा वाटा म्हणून समाजकार्यात प्रामाणिकपणे आणि निष्ठेने सक्रिय राहिले पाहिजे या जाणिवेतूनच आपण सामाजिक कार्यात सक्रिय आहोत असे प्रामाणिक मत प्रमाणित लेखापरीक्षक तथा सामाजिक कार्यकर्ते भिमशाहीर चंद्रकांत खंडू शिंदे यांनी सिंदगाव ता. तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.

दि.१० जून रोजी सिंदगाव ता.तुळजापूर येथील बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर,

चळवळीतील एक अभ्यासू आणि निष्ठावंत कार्यकर्ते,आपल्या मधुर वाणीतून बुद्ध फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करणारे भिमशाहीर हार्मोनियम वादक तथा गायक व प्रमाणित लेखापरीक्षक चंद्रकांत शिंदे यांच्य ६३ का वाढदिवसा निमित्ताने सिंदगाव येथे अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात्प्रसंगी सत्काराला उत्तर देताना चंद्रकांत शिंदे बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे नेते आर. एस.गायकवाड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वंचित बहुजन आघाडीचे माजी तुळजापूर तालुका अध्यक्ष तथा माजी सैनिक अंकुश लोखंडे हे होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून सामुदायिक रित्या बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.



यात्प्रसंगी अध्यक्षिय स्थानावरून बोलताना आर.एस.गायकवाड म्हणाले की चंद्रकांत शिंदे हे सामाजिक जाणीव चे कार्यकर्ते असून आपला घर प्रपंच सांभाळत ते आपल्या मधुर वाणीतून भीम गीत गायनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा फार मोठं सामाजिक कार्य करतात आपल्या प्रेमळ आणि नम्र स्वभावामुळे चळवळीतील सर्व कार्यकर्त्यात,नातेवाईकात त्यांनी एक माणूसकीचा जिव्हाळा निर्माण केला आहे.तर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना अंकुश लोखंडे म्हणाले की महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे व्यक्तीमत्व म्हणजे चंद्रकांत शिंदे होय.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रिपाइं(आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के.गायकवाड यांनी केले यात्प्रसंगी मतोश्री शांताबाई शिंदे,वंदना तात्याराव वाघमारे, कलाप्पा गायकवाड,दत्ता कांबळे, बालाजी गायकवाड, प्रशांत शिंदे,बालाजी शिंदे, संतराम गायकवा, अण्णासाहेब वाघमारे सह शालेय विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सोनार दाम्पत्यांकडून मुलाच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमास पाण्याच्या टाक्या भेट...!

### वाढदिवसासाठी होणाऱ्या अनावश्यक होणाऱ्या खर्चांना सोनार परिवाराचा फाटा...!

## गरजवंतांची गरज भागविण्यासाठी प्रयत्नशील असणे हा आनंद खूपच मोठा आहे...! - कवी रवि वसंत सोनार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : आपले सण आणि उत्सव साजरे करत असताना आपल्या अवतीभोवती असणाऱ्या गरजवंतांची यथाशक्ती गरज भागवल्यानंतर मनाला मिळणारा आनंद हा कितीतरी मोठा असतो. असे मत येथील सामाजिक कार्यकर्ते व विश्वविक्रमवीर कवी रवि वसंत सोनार यांनी व्यक्त केले. ते त्यांचे सुपुत्र चि. ओंकार रवि सोनार यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने श्री. व सौ. सविता रवि सोनार यांच्या माध्यमातून गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमातील मागणीनुसार पिण्याच्या पाण्याच्या टाक्या भेट देण्या प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना कवी रवि सोनार म्हणाले की आपले वाढदिवस व सण उत्सव हे नक्कीच साजरे करावेत. परंतु अशा प्रसंगी आपल्या अवतीभोवती असणाऱ्या गरजवंतांना थोडीफार मदत करणे हे सुद्धा नक्कीच आवश्यक आहे. आम्ही सखा सखी यथाशक्ती या गोष्टीचे पालन करण्याचा नेहमी प्रयत्न करत असतो. तसाच इतरांनीही यथाशक्ती प्रयत्न करावा अशी अपेक्षा आहे.

यात्प्रसंगी सौ. सविता रवि सोनार सामाजिक कार्यकर्ते मा. सचिन कुलकर्णी, वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक मा. श्री. राक्षे तसेच वृद्धाश्रमातील ज्येष्ठ बंधू भगिनी उपस्थित होते. यावेळी बोलताना मा. सचिन कुलकर्णी म्हणाले की वाढदिवसासाठी होणाऱ्या अनावश्यक होणाऱ्या सर्व खर्चांना फाटा देत मागील जवळपास पंधरा वर्षे सातत्याने वेगवेगळ्या व्यक्ती आणि संस्था यांना वेगवेगळ्या औचित्याने मदत व सहकार्य करण्याचे पंढरपूरचे आदर्श सखा-सखी असणाऱ्या सोनार दांपत्यांचे काम हे खरोखरच कौतुकास्पद आहे. यावेळी बोलताना वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक मा. श्री. राक्षे म्हणाले की पंढरपूरचे आदर्श पती-पत्नी असणाऱ्या सोनार दांपत्यांकडून मागील अनेक वर्षांपासून नेहमीच पूर्व चौकशी करून वृद्धाश्रमास लागणाऱ्या वस्तू किंवा गोष्टी दिल्या जातात. ही गोष्ट नक्कीच महत्त्वाची अशी आहे.

यावेळी मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठ महिला व पुरुषांना मिष्टान्न वाटप करण्यात आले. तसेच वृद्धाश्रमातील ज्येष्ठांनी गीताच्या माध्यमातून चि. ओंकार सोनार यास शुभाशीर्वाद दिले. मुलाच्या वाढदिवसाच्या औचित्याने पंढरपूरचे आदर्श पती-पत्नी असणारे श्री. व सौ. सविता रवि सोनार यांच्या या उपक्रमामुळे पंढरपूर आणि परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे कौतुक होत आहे.ी

यावेळी मातोश्री वृद्धाश्रमाचे मॅनेजर श्री धनाजी राक्षे, श्री सचिन कुलकर्णी संपादक, व श्री व सौ सविता व रवी सोनार, इत्यादी जण उपस्थित होते.